**ठळक बातम्या**

- वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची नीट परीक्षा रद्द, पेपरफुटीचा तपास सीबीआय करणार

- सलग दुसऱ्यांदा हिमंता बिस्वा सर्मा यांनी घेतली आसामच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

- तमिळनाडूमध्ये अण्णाद्रमुकच्या ३० आमदारांचा गट मुख्यमंत्री जोसेफ विजय यांना पाठिंबा देण्याच्या तयारीत

**आणि**

- चंद्रपूरच्या उज्वला सोयम यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय फ्लोरेन्स नाईटिंगेल पुरस्काराने गौरव

**<><><><><>**

देशभरात विविध केंद्रांवर ३ मे रोजी घेतलेली वैद्यकीय प्रवेशासाठीची NEET-UG २०२६ परीक्षा रद्द केल्याचं एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं आज जाहीर केलं. परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका फुटल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला असून या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवला आहे. ही परीक्षा पुन्हा होणार असून मात्र त्या तारखा जाहीर झालेल्या नाहीत. फेरपरीक्षेच्या तारखा तसंच नव्यानं प्रवेशपत्र जारी करण्याचे वेळापत्रक लवकरच अधिकृत माध्यमांतून जाहीर केले जाईल. या प्रकरणाच्या चौकशीसाठी सीबीआयला सर्व आवश्यक कागदपत्रे, नोंदी दिल्या जातील तसंच तपासात पूर्ण सहकार्य केलं जाईल, असं एनटीए नं म्हटलं आहे.

नीट ही परीक्षा एमबीबीएससह वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी घेतली होती. सुमारे २३ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती.

**<><><><><>**

ज्येष्ठ भाजपा नेते हिमंता बिस्वा सर्मा यांनी आज आसामचे मुख्यमंत्री म्हणून सलग दुसऱ्या कार्यकाळासाठी शपथ घेतली. राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी त्यांना पदाची

आणि गोपनीयतेची शपथ दिली. गौहत्तीमध्ये झालेल्या या शपथग्रहण समारंभात रामेश्वर तेली, अजंता नेओग , अतुल बोरा आणि चरण बोरो या चार आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री आणि रालोआ प्रणित शासन असलेल्या राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

तमिळनाडूमध्ये अण्णाद्रमुक पक्षात फूट पडल्याची चिन्हं आहेत. पक्षातल्या एका गटानं मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या पक्षाला पाठिंबा द्यायचा निर्णय जाहीर केला आहे. एस. पी. वेलुमणी आणि सी. व्ही. षण्मुगम यांच्या नेतृत्त्वाखाली हे ३० आमदार एकत्र आले आहेत. दुपारी विजय यांची भेट घेऊन पाठिंब्याचं पत्र देणार असल्याचं या नेत्यांनी सांगितलं. वेलुमणी यांची विधीमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करत असल्याचं पत्रही त्यांनी काल विधानसभेच्या काळजीवाहू अध्यक्षांना काल दिलं. द्रमुकच्या साथीनं सरकार स्थापन करण्याचा अण्णाद्रमुकचे सरचिटणीस ई. के. पलानीस्वामी यांचा प्रयत्न असल्याचा आरोपही या आमदारांनी केला आहे. पक्षाच्या उर्वरित १७ आमदारांनी पलानीस्वामी यांची विधीमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांचे सहाय्यक चंद्रनाथ रथ यांच्या हत्येचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला असून याप्रकरणी एफआयआर नोंदवण्यात आला आहे. याआधी पश्चिम बंगाल पोलिस याप्रकरणाचा तपास करत होते. राज्य सरकारनं विनंती केल्यामुळे हा तपास सीबीआयकडे सोपवला आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर दोन दिवसांनी रथ यांची हत्या झाली होती. याप्रकरणी तपास पथकानं काल उत्तर प्रदेश आणि बिहारमधून तिघाजणांना अटक केली आहे.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसनं केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठविलेल्या कार्यकारिणीच्या यादीत प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांची नावे नसल्याचे उघड झाल्याने गदारोळ निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे २९ एप्रिलला पाठविलेल्या या यादीत सरचिटणीस म्हणून पार्थ पवार आणि चिटणीस म्हणून जय पवार यांच्या नावांचा समावेश आहे. मात्र कारकुनी

चुकीमुळे हे पत्र पाठवले असून लवकरच त्यात दुरुस्ती केली जाईल, असं पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी समाज माध्यमांद्वारे कळवलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या १५ परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट कामगिरीसाठी राष्ट्रीय फ्लोरेन्स नाईटिंगेल पुरस्कार आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. महाराष्ट्रात चंद्रपूर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गेल्या २४ वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या उज्ज्वला महादेव सोयम यांचा पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे. चंद्रपूर जिल्ह्यात आदिवासी भागांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करणं, स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध तसंच नक्षलग्रस्त भागात आणि आपत्तीकाळात गर्भवती स्त्रियांसाठी केलेल्या आरोग्य सेवेसाठी सोयम यांना हा पुरस्कार देण्यात आला. केंद्र आणि राज्य सरकारं, केंद्रशासित प्रदेश आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये सेवा देणाऱ्या नोंदणीकृत नर्सेस, मिडवाइव्हज, ऑक्झिलरी नर्स मिडवाइव्ह आणि लेडी हेल्थ व्हिजिटर यांना हे प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान केले जातात. या पुरस्काराचं स्वरुप प्रमाणपत्र, एक लाख रुपये रोख पारितोषिक आणि आरोग्य योद्धांनी केलेल्या अमूल्य सेवेबद्दल देशाच्या कृतज्ञतेचं प्रतीक असलेलं पदक असं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या शुक्रवारपासून संयुक्त अरब अमिरात, नेदरलँडस, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पांच देशांच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात  मोदी शुक्रवारी यूएईमध्ये पोहोचतील. तिथे त्यांची अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायद अल नाह्यान यांची भेट नियोजित आहे. दोन्ही नेते द्विपक्षीय मुद्द्यांवर, विशेषत: ऊर्जा सहयोग तसंच परस्पर स्वारस्य असलेल्या, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्यांवर आपले विचार मांडतील. या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात प्रधानमंत्री नेदरलँडसमध्ये राजे विल्यम अलेक्झांडर आणि राणी मॅक्सिमा यांची भेट घेणार असून त्यानंतर ते रॉब जेटन यांच्याबरोबर चर्चा करणार आहेत. आपल्या स्वीडन दौऱ्यात स्वीडिश समकक्ष क्रिस्टर्सन यांच्यासह प्रधानमंत्री द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

चौथ्या टप्प्यात सोमवारी प्रधानमंत्री नॉर्वेमध्ये तिसऱ्या भारत नॉर्डिक शिखर बैठकीमध्ये सहभागी होणार आहेत. भारताच्या प्रधानमंत्र्यांची नॉर्वेला ही 43 वर्षातील पहिली

भेट असेल. आपल्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात, प्रधानमंत्री, इटलीचे राष्ट्रपती सर्जियो मॅटारेला यांची भेट घेतील आणि प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याशी चर्चा करतील. अलीकडेच झालेल्या भारत-युरोपियन संघ मुक्त व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर, भारताची युरोपसोबतची भागीदारी अधिक दृढ होण्यास या दौऱ्यामुळे मदत होईल असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरील रामाफोसा यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा द्यायला नकार दिला आहे. २०२० मध्ये त्यांच्या शेतावरून मोठी रक्कम चोरीला गेली होती. या प्रकरणावरून त्यांच्यावर भ्रष्टाचार, करचोरी, नैतिकता असे बरेच आरोप होऊन आता महाभियोग चालवला जात आहे.

<><><><>

श्रीलंकन सरकारनं सायबर गुन्हेगारांविरोधात धडक कारवाई सुरू केली असून याअंतर्गंत आतापर्यंत २००  परदेशी नागरिकांना अटक केली आहे. अटक केलेल्यांमध्ये १७३ भारतीय तर २५ नेपाळी नागरिकांचा समावेश असल्याची माहिती श्रीलंकन पोलिसांनी आज दिली.

अटक केलेले सर्वजण २५ ते ३५ वयोगटातील असून हे सर्वजण पर्यटन व्हिसावर श्रीलंकेत आले होते. त्यांच्या व्हिसाची मुदत संपल्यानंतरही त्यांनी श्रीलंकेत वास्तव्य कायम ठेवलं आणि इथं रोजगार मिळवले. त्याबरोबरच हे सर्वजण सायबर गुन्हेगारी कारवाईत सहभागी झाल्याचं आढळून आल्यानं त्यांना अटक केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><>

भारतामध्ये तिसऱ्या शतकात विकसित झालेल्या द्विमान अंक पद्धतीच्या आधारे आज जगाचा कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा प्रवास होत असल्याचं दावा परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी आज केला आहे. ते न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयात “गणितातील भारताचं योगदान “ या विषयावरच्या प्रदर्शनाचं उद्घाटन करताना बोलत होते.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात होणार आहे. अहमदाबादमध्ये नरेंद्र मोदी मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

काल धर्मशाला इथे झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने पंजाब किंग्जचा ३ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या पंजाब किंग्जने निर्धारित २० षटकांत ५ गड्यांच्या मोबदल्यात २१० धावा केल्या होत्या. दिल्ली कॅपिटल्सने हे लक्ष्य १९ षटकांत ७ गड्यांच्या मोबदल्यात २१६ धावा करत पूर्ण केलं.

**<><><><><>**

चीनच्या ह्युनान प्रांतातल्या एका निवासी इमारतीला लागलेल्या आगीत पाच जणांचा मृत्यू झाला तर दोनजण जखमी झाले आहेत.आगीचं नेमकं कारण अद्याप समोर आलेले नसून त्याचा तपास सुरू आहे.

**//<><><><><>//**